# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांकः- ६८-२२** **दिनांक - ०१/०३/२०२२**

## अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २६.०२.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध भाईंदर पथकाचे पोहवा/९२०३३ उमेश पाटील यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये मिरा-भाईंदर परिसरात काही बांगलादेशी नागरीक अनधिकृतपणे राहत असून मजुर म्हणुन काम मिळण्यासाठी रसाज थिएटर, मिरारोड पुर्व येथे एकत्र जमा होतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी साफळा रचुन ०७ स्त्री-पुरुष बांगलादेशी नागरीकांना ताब्यात घेवून त्यांचेकडे प्राथमिक विचारपूस केली असता, ते पारपत्र व व्हीसाशिवाय अनधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द पोहवा/९२०३३ उमेश हरी पाटील, नेम. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा क्र. १२३/२०२२ भारतीय पासपोर्ट अधि. १९२० चे कलम ३(अ), ६(अ) सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोना/०३०१५ वैष्णवी यंबर, चा.पोना/०६१०६ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----